# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. २३६/२०२६

**विषय:— शिक्षकीय पदाचा कार्यभार (Academic Workload) संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने सादर करणेबाबत...**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, अहिल्यानगर व नाशिक या तीनही जिल्ह्यातील सर्व **व्यावसायिक अभ्यासक्रम** असलेल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शिक्षकीय पदे भरताना विद्यापीठाकडून कार्यभार (Academic Workload) तपासून घेणे आवश्यक असते.

विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या सर्व महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी कार्यभार तपासून घेताना यापुढे संगणकीय प्रणालीद्वारे कार्यभार (Academic Workload) तपासण्याकरिता प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. कार्यभार तपासून घेताना संबंधित शिखर संस्थांनी ठरवून दिलेल्या निकषाचे व नियमांचे पालन करणे बंधनकारक असेल. शिक्षकीय पदाचा कार्यभार (Academic Workload) तपासून घेताना संबंधित प्राचार्य/संचालक यांनी विषयांचे वाटप, वर्ग/तुकडी, विद्यार्थी संख्या इत्यादी बाबी काळजीपूर्वक तपासून घेऊन संगणक प्रणालीमध्ये माहिती समाविष्ट करावयाची असल्याने अचूक व योग्य माहिती भरणे अनिवार्य आहे. उपरोक्त माहिती भरून झाल्यानंतर ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावा, ऑफलाईन पध्दतीने प्रस्ताव विद्यापीठास सादर करण्याची आवश्यकता नाही.

त्याचप्रमाणे संगणकीय प्रणालीमध्ये अचूक व योग्य माहिती भरण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील प्राचार्य/संचालक यांची राहील. अपूर्ण व अस्पष्ट माहिती संगणकीय प्रणालीमध्ये सादर केल्यास यावर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही आणि याबाबत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची नोंद संबधित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेने घ्यावी.

**How to Apply :**

**College BOD Login ⟶ Approval Online ⟶ Apply for Workload**

26/10/2026

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
जा. क्र. सीसीओ/६२८४
दि. २६ ऑक्टोबर, २०२६

(स. द. डाकेखर)
उपकुलसचिव
अतिरिक्त कार्यभार